# कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी येथे 'दुग्धव्यवसाय व्यवस्थापन' प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न!

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व पशुपालकांना आधुनिक, तंत्रज्ञानयुक्त आणि अधिक फायदेशीर दुग्धव्यवसायाचे धडे देण्यासाठी के. वि. के. पोखर्णी,जि. नांदेड येथे दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. महेश अंभोरे (पशुवैद्यक तज्ञ) यांनी आयोजित केले होते.

**प्रमुख मार्गदर्शक**
डॉ. अरविंद गायकवाड
सहाय्यक आयुक्त
पशु चिकित्सालय, नांदेड

**प्रशिक्षणामधील प्रमुख आकर्षणे व विषय:**
✅ मुरघास (Silage) निर्मिती: वर्षभर हिरवा चारा उपलब्ध ठेवण्यासाठीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक.
✅ ऍझोला (azola ) दुग्धव्यवसायासाठी वरदान ठरणारा पूरक पशुआहार
✅ संतुलित पशुआहार: दुधातील फॅट आणि SNF वाढवण्यासाठी मिनरल मिक्सचरचा योग्य वापर.
✅ आधुनिक गोठा व्यवस्थापन: कमी खर्चातील मुक्त संचार गोठा पद्धत आणि सुधारीत जनावरांची निवड.
✅ आरोग्य व लसीकरण: कासदाह, लाळ्या-खुरकुत टाळण्यासाठी प्रतिबंधक उपाय.
✅ शासकीय योजना: दूध प्रक्रिया उद्योग आणि बँक कर्ज योजनांबाबत सविस्तर माहिती.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी शेतकरी बंधूंना कृषि विज्ञान केंद्र पोखर्णीच्या प्रा. माणिक कल्याणकर (पिक संरक्षण तज्ञ ) डॉ. महेश अंभोरे (पशु वैद्यक तज्ञ ) सौं.अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ) डॉ. अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ) तसेच श्री. राजीव इंगोले यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दुग्धव्यवसाय अधिक नफादायक बनवण्यासाठी के.वि.के पोखर्णी, नांदेड -१
नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे!





Krishi Vigyan Kendra
कृषि विज्ञान केंद्र
Training for Practicing Farmers
प्रशिक्षण-शेतकरी







Krishi Vigyan Kendra
कृषि विज्ञान केंद्र

Krishi Vigyan Kendra
कृषि विज्ञान केंद्र

Krishi Vigyan Kendra
कृषि विज्ञान केंद्र

Krishi Vigyan Kendra
कृषि विज्ञान केंद्र

Krishi Vigyan Kendra
कृषि विज्ञान केंद्र